


पेठनाका : प्रा. डॉ. दीपक पाटील यांचा सत्कार करताना डॉ. व्ही. ए. कुलकर्णी.

# नानासाहेब महाडिक कॉलेजमध्ये क्रीडादिन उत्साहात साजरा

**इस्लामपूर (प्रतिनिधी) :** येथील नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये राष्ट्रीय क्रीडादिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रा. डॉ. दीपक पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. ए. कुलकर्णी उपस्थित होती. प्रा. डॉ. पाटील यांनी मेजर ध्यानचंद यांच्या कारकीर्दीच्या आठवणी सांगितल्या. प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांनी विविध स्तरावरील क्रीडा स्पर्धांची माहिती दिली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या संधीही सांगितल्या. विद्यार्थिनी मृणाल कुंभार हिने मनोगत व्यक्त केले. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संदीप पाटील यांनी प्रास्ताविक केले. शिवानी मस्के हिने सूत्रसंचालन केले. अमित माने यांनी आभार मानले.